भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

(सन १८८२ चा अधिनियम क्रमांक ७)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

# The Powers of Attorney Act, 1882

(Act No. 7 of 1882)

[As in force on the 28th February 1994]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[किंमत : रु. १.९० पैसे]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान असलेला पॉवर ऑफ अॅटर्नी अॅक्ट, १८८२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५ अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठे १८ ते १९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जून १९९४.

---

## PREFACE

This edition of the Power of Attorney Act, 1882 as on the 28th February 1994 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*. Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June 1994 on pages 18 to 19.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 23rd June 1994.

## मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

### विशोधन अधिनियम व विनियम यांची सूची

१. भाग ख राज्ये (विधी) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).

२. दादरा व नगर हवेली (विधी) विनियम, १९६३ (१९६३ चा ६).

३. पाँडिचेरी (विधींचा विस्तार) अधिनियम, १९६८ (१९६८ चा २६).

४. मुखत्यारनामा (विशोधन) अधिनियम, १९८२ (१९८२ चा ५५).

एच ४२२६—२ (१०२१—११-९४)

# मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव.
स्थानिक विस्तार.
प्रारंभ.

१क. व्याख्या.

२. मुखत्यारनाम्याअन्वये निष्पादन करणे.

३ मृत्यू, वगैरेंची माहिती नसताना मुखत्याराने मुखत्यारनाम्या अन्वये केलेले प्रदान विधिग्राह्य असणे.

४ मुखत्यारी अधिकार निर्माण करणारे मूळ संलेख जमा करणे.

५ विवाहित स्त्रियांचा मुखत्यारनामा.

६ [निरसित].

शब्दसूची—

मराठी—इंग्रजी

इंग्रजी—मराठी

# मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

## (सन १८८२ चा अधिनियम क्रमांक ७)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

[२४ फेब्रुवारी, १८८२]

मुखत्यारनाम्यांशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करण्यासाठी अधिनियम

मुखत्यारनाम्यांशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करण्याच्या प्रयोजनार्थ, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. स्थानिक विस्तार व प्रारंभ.

१. या अधिनियमास "मुखत्यारनामा अधिनियम, १८८२" असे म्हणता येईल.

हा अधिनियम [1][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतास लागू आहे[2] ;

आणि तो दिनांक १ मे १८८२ रोजी अंमलात येईल.

[3][ १क. या अधिनियमात, "मुखत्यारनामा" या शब्दात, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे, तो निष्पादित करून देणाऱ्या व्यक्तीच्या वतीने व तिच्या नावाने काम करण्यासाठी एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीस मुखत्यारी प्रदान करण्यात आली असेल अशा कोणत्याही संलेखाचा समावेश होतो. ] व्याख्या.]

मुखत्यारनाम्याअन्वये निष्पादन करणे.

२. मुखत्यारनाम्याच्या आदात्यास योग्य वाटले तर, त्यास आपल्या स्वत:च्या नावाने व सहीनिशी आणि जेथे मोहोर लावण्याची आवश्यकता असेल तेथे आपली स्वत:ची मोहोर लावून, अशा मुखत्यारनाम्याच्या दाता व्यक्तीच्या प्राधिकाराने, [4] * * * * कोणताही संलेख निष्पादित करून देता येईल किंवा कोणतीही गोष्ट करता येईल; आणि अशा रीतीने निष्पादित करून[5] * * * दिलेला प्रत्येक संलेख किंवा केलेली प्रत्येक गोष्ट ही, जणू काही मुखत्यारनाम्याच्या आदात्याने अशा मुखत्यारनाम्याच्या दाता व्यक्तीच्या नावाने व तिच्या सहीनिशी व तिची मोहोर लावून तो संलेख निष्पादित केलेला असावा किंवा ती गोष्ट केलेली असावी अशा तऱ्हेने कायद्याने परिणामकारक ठरेल.

हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी किंवा अंमलात आल्यानंतर निष्पादित करून दिलेल्या संलेखाद्वारे निर्माण करण्यात आलेल्या मुखत्यारनाम्यांना हे कलम लागू आहे.

मृत्यू वगैरेची माहिती नसताना मुखत्याराने मुखत्यारनाम्याअन्वये केलेले प्रदान. विधिग्राह्य असणे.

३. एखाद्या मुखत्यारनाम्याच्या अनुरोधाने कोणत्याही व्यक्तीने सद्भावपूर्वक कोणत्याही रकमेचे प्रदान केले असेल किंवा सद्भावपूर्वक कोणतेही कृत्य केले असेल तर त्या प्रसंगी, असे प्रदान किंवा कृत्य करण्यापूर्वी मुखत्यारनाम्याची दाता व्यक्ती मरण पावली होती किंवा ती[6] * * * विकृतचित्त झाली होती किंवा[7] * * * * नादार झाली होती किंवा तिने मुखत्यारनामा मागे घेतला होता या कारणावरून, असे प्रदान किंवा कृत्य करणारी व्यक्ती त्या प्रदानाच्या किंवा कृत्याच्या संबंधात जबाबदार ठरणार नाही—मात्र, असे प्रदान किंवा कृत्य करणाऱ्या व्यक्तीस, प्रदान किंवा कृत्य करण्याच्या वेळी मुखत्यारनाम्याच्या दाता व्यक्तीचा मृत्यू घडून आला होता किंवा ती[6] * * * विकृतचित्त, [7] * * * * नादार झाली होती किंवा तिने असा मुखत्यारनामा मागे घेतला होता ही गोष्ट माहीत नसली पाहिजे :

---

१ भाग 'ख' राज्ये (विधी) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३), कलम ३ व अनुसूची याअन्वये, "भाग 'ख' राज्ये खेरीजकरून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. दादरा व नगर हवेली (विधी) विनियम, १९६३ (१९६३ चा ६), कलम २, अनुसूची एक अन्वये दादरा व नगर हवेलीवर आणि १९६८ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ३ व अनुसूची भाग एक अन्वये पाँडिचेरीवर या अधिनियमाचा विस्तार करण्यात आला.

३. मुखत्यारनामा (विशोधन) अधिनियम १९८२ (१९८२ चा अधिनियम क्रमांक ५५) याच्या कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, "कोणतेही हस्तांतरणपत्र" हा मजकूर वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, "दिलेले प्रत्येक हस्तांतरणपत्र" हा मजकूर वगळण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये, "वेडी अथवा" हे शब्द वगळण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये, "दिवाळखोर अथवा" हे शब्द वगळण्यात आले.

परंतु, अशा रीतीने प्रदान केलेल्या कोणत्याही पैशात हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा प्रदानग्राहीविरुद्ध जो कोणताही हक्क असेल त्यास या कलमामुळे बाध येणार नाही; आणि अशा पैशाचे प्रदान करणाऱ्या व्यक्तीने असे प्रदान केले नसते तर, त्या प्रदानकर्त्या व्यक्तीविरुद्ध अशा हित-संबंधित व्यक्तीस जी उपाययोजना करता आली असती तशीच उपाययोजना त्या हितसंबंधित व्यक्तीस प्रदानग्राहीविरुद्ध करता येईल.

हा अधिनियम अंमलात आल्यानंतर केलेल्या प्रदानांना व कृत्यांनाच फक्त हे कलम लागू असेल.

**मुखत्यारनामा निर्माण करणारे मूळ संलेख जमा करणे.**

४. (क) एखादा मुखत्यारनामा निर्माण करणाऱ्या संलेखाचे निष्पादन प्रतिज्ञालेखाद्वारे, संविधिक घोषणेद्वारे, किंवा इतर पुरेशा पुराव्याद्वारे सत्यापित करण्यात आल्यावर, असा प्रतिज्ञालेख किंवा अशी घोषणा केली असल्यास, त्यासह तो संलेख, तो ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत करण्यात आला असेल त्या उच्च न्यायालयात [1][किंवा जिल्हा न्यायालयात] जमा करता येईल.

(ख) अशा रीतीने जमा केलेल्या संलेखांची एक स्वतंत्र फाईल ठेवण्यात येईल; आणि कोणत्याही व्यक्तीस त्या फाईलीची पडताळणी करता येईल, आणि अशा रीतीने जमा केलेल्या प्रत्येक संलेखाची तपासणी करता येईल; आणि तिने विनंती केल्यावर त्याची प्रमाणित प्रत तिला देण्यात येईल.

(ग) अशा रीतीने जमा करण्यात आलेल्या एखाद्या संलेखाची प्रत कार्यालयात सादर करता येईल आणि प्रमाणित प्रत म्हणून तिच्यावर शिक्का मारता येईल किंवा तसे चिन्हित करता येईल आणि अशा रीतीने शिक्का मारल्यावर किंवा चिन्हित करण्यात आल्यावर ती प्रत प्रमाणित प्रत होईल व तशी राहील.

(घ) अशा रीतीने जमा करण्यात आलेल्या संलेखाची प्रमाणित प्रत ही, आणखी पुरावा नसला तरी, त्या संलेखातील मजकुराबाबत व तो उच्च न्यायालयात [1][किंवा जिल्हा न्यायालयात] जमा करण्यात आल्याबाबतचा पुरेसा पुरावा ठरेल.

(ङ) उच्च न्यायालय, वेळोवेळी या कलमाच्या प्रयोजनांकरिता नियम करू शकेल, आणि त्याद्वारे ते न्यायालय राज्य शासनाच्या सहमतीने खंड (क), (ख) आणि (ग) अन्वये घ्यावयाची फी विहित करू शकेल.

[2]* * * * * *

(छ) मुखत्यारनामा निर्माण करणारे जे संलेख हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी किंवा अंमलात आल्यानंतर निष्पादित करून दिले असतील त्या संलेखांना हे कलम लागू आहे.

**विवाहित स्त्रियांचा मुखत्यारनामा.**

५. [3][एखाद्या सज्ञान वयाच्या विवाहित स्त्रीस] जो कोणताही अमृत्युपत्रीय संलेख स्वतः निष्पादित करून देता आला असता असा कोणताही अमृत्युपत्रीय संलेख निष्पादित करून देण्यासाठी, किंवा तिला इतर जे कोणतेही कृत्य स्वतः करता आले असते असे कोणतेही इतर कृत्य करण्यासाठी, त्या स्त्रीस [4][जणू ती अविवाहित असल्याप्रमाणे,] या अधिनियमाच्या आधारे एखाद्या अमृत्युपत्रीय संलेखाद्वारे त्या कामाच्या प्रयोजनार्थ आपल्या वतीने एखाद्या मुखत्याराची नेमणूक करण्याचा अधिकार असेल; आणि मुखत्यारी अधिकार निर्माण करणाऱ्या संलेखांच्या संबंधातील या अधिनियमाचे उपबंध अशा बाबतीत लागू होतील.

हा अधिनियम अंमलात आल्यानंतर निष्पादित करून दिलेल्या संलेखानाच हे कलम लागू आहे.

६. [सन १८६६ चा अधिनियम २८, कलम ३९, निरसित] विशोधन अधिनियम, १८९१ (१८९१ चा १२), कलम २ व अनुसूची एक अन्वये निरसित.

---

१. सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ५५, याच्या कलम ५ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

२. लोअर बर्मा न्यायालय अधिनियम, १९०० (१९०० चा ६), कलम ४८ व अनुसूची दोन अन्वये खंड (च्) निरसित करण्यात आला.

३. सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम ६ अन्वये "एखाद्या विवाहित स्त्रीस, मग ती अज्ञान असो वा नसो," या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये "जणू ती अविवाहित व सज्ञान वयाची असल्याप्रमाणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

# मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

# THE POWERS OF ATTORNEY ACT, 1882

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| जबाबदार | liable | [क. ३] |
| नादार | insolvent | [क. ३] |
| निष्पादित करून देणे | execute | [क.२] |
| प्रतिज्ञालेख | affidavit | [क.४] |
| प्रदानग्राही | payee | [क. ३] |
| मागे घेणे | revoke | [क.३] |
| मुखत्यार | attorney | [शीर्षक] |
| मुखत्यारनामा | powers-of-attorney | [क. २] |
| मुखत्यारनाम्याचा आदाता | donee of the power of attorney | [क. २] |
| मुखत्यारनाम्याचा दाता | doner of the power of attorney | [क. २] |
| विकृतचित्त | of unsound mind | [क. ३] |
| विधिग्राह्य | good | [क. ३ स. टी.] |
| सत्यापित करणे | verify | [क. ४] |
| संलेख | instrument | [क. २] |
| सांविधिक घोषणा | statutory declaration | [क.४] |

# THE POWERS OF ATTORNEY ACT, 1882

## मुखत्यारनामा अधिनियम, १८८२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| affidavit | प्रतिज्ञालेख | [S. 4] |
| attorney | मुखत्यार | [Title] |
| donee of the power of attorney | मुखत्यारनाम्याचा आदाता | [S. 2] |
| donor of the power of attorney | मुखत्यारनाम्याचा दाता | [S. 2] |
| execute | निष्पादित करून देणे | [S. 2] |
| good | विधिग्राह्य | [S. 3-m.n.] |
| insolvent | नादार | [S. 3] |
| instrument | संलेख | [S. 2] |
| liable | जबाबदार | [S. 3] |
| lunatic | वेडा | [S. 3] |
| payee | प्रदानग्राही | [S. 3] |
| powers of attorney | मुखत्यारनामा | [S. 1] |
| revoke | मागे घेणे | [S. 3] |
| statutory declaration | संविधिक घोषणा | [S. 4] |
| of unsound mind | विकलचित्त | [S. 3] |
| verify | सत्यापित करणे | [S. 4] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई